REGISTERED No. B 3134.




# अर्थ


" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १० सप्टेंबर १९४७ अंक ३७

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

1. बँका आणि त्यांचे व्यवहार
2. हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
3. व्यापारी उलाढाली
4. सहकार




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें १.

## विविध माहिती

**ऑफस् बँक ऑफ इंडिया लि. वर मनाई हुकूम**

वरील बँकेस सोमवार, ता. ८ सप्टेंबरपासून नवीन ठेवी घेण्यास मनाई करणारा हुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. ठेविदारांच्या हितास बाधक अशा रीतीनें बँकेचा कारभार चालू असल्याविषयीं सरकारची खात्री झाल्यावरून हा हुकूम काढण्यांत आला आहे.

**हिंदुस्थानासाठी खोबरें**—इंटरनॅशनल इमर्जन्सी फूड कौन्सिलच्या वॉशिंग्टन येथें भरलेल्या बैठकींत हिंदुस्थानासाठी १९४७ सालांत ८,००० टन खोबरें देण्याची शिफारस करण्यांत आली आहे. चरबी आणि तेलें ह्यांपैकी जीं आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्वाची आहेत, त्यांचें वांटप ह्या संस्थेतर्फे होत असतें.

**साखरेच्या उत्पादनाचा अंदाज**—हिंदी साखरेच्या उत्पादनासंबंधी पुढील सरकारी अंदाज प्रसिद्ध करण्यांत आला आहे:—१९४६–४७ सालांत हिंदुस्थानांतील गुळाचें उत्पादन ५५,७६,००० टन होईल. गेल्या वर्षीपेक्षां हें उत्पादन ३ टक्के अधिक आहे. उंसाच्या लागवडीचें एकंदर क्षेत्र ४१,०८,००० एकर असावें. गेल्या वर्षी हाच आंकडा ३८,२५,००० एकर होता. देशांतील कांहीं भाग वगळून इतर ठिकाणीं उंसाचें पीक सरासरीनें चांगलें आहे.

**आसाममधील कोळसा कामगार**—बंगाल आणि विहारमधील कोळशाच्या खाणींतील कामगारांना नुकत्याच ज्या सवलती देण्यांत आल्या, त्याबरहुकूम आसाममधील कोळसा कामगारांनाही सवलती देण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक चौकशी–कमिटी नेमली आहे.

**अमेरिकन चित्रपटावरील ब्रिटिश जकात**—अमेरिकन चित्रपट संघाचे अध्यक्ष, मि. एरिक जॉन्स्टन, ह्यांनी अमेरिकन चित्रपटावर लौकरच घेण्यांत येणाऱ्या ६५ टक्के निर्यात जकातीविषयीं ब्रिटिश शिष्टमंडळाचे पुढारी मि. एडि ह्यांच्याशीं टेलिफोनवरून चर्चा केली. निर्णय कांहींच घेण्यांत आला नाहीं. अमेरिकन चित्रपटांशीं ब्रिटिश चित्रपट स्पर्धा करूं शकत नाहींत हें महशूरच आहे. पण इंग्लंडला पडलेला डॉलरचा तुटवडा भरून काढण्यासाठी अमेरिकन चित्रपटांच्या आयातीवर अधिक कर बसविण्याच्या सूचना येत आहेत. त्या दृष्टीनें वरील वाटाघाटी महत्त्वाच्या आहेत.

**बेलिजअन् कांगोमधील युरेनिअम**—ॲटम बॉंबच्या व अणुशक्तीच्या उत्पादनांत वापरण्यांत येणारें युरेनिअम बेल्जिअन् कांगोमध्यें विपुल सांपडतें. ह्या धातूच्या जगाच्या साठ्यापैकीं ६० टक्के साठा बेल्जिअन कांगोमध्यें आहे असें म्हणतात. गेल्या महायुद्धाच्या आरंभींच अमेरिकेनें ह्या सांठ्यावर मालकी मिळविली आहे. ज्या करारान्वयें ही मालकी अमेरिकेला मिळाली, त्याबाबत फारच गुप्तता राखण्यांत येत आहे.

**हिंदुस्थानाची सीलोनला मदत**—सिलोनमध्यें नुकत्याच झालेल्या पुराच्या आपत्तींत सांपडलेल्या आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी हिंदुस्थान सरकारनें २ लाख रुपयांची देणगी दिली आहे. ह्या जलप्रलयामुळें १५० लोक बुडून मेल्याचें आणि २० हजार निराश्रित झाल्याचें समजतें.

**फेरीवाल्यांचे परवाने**—मुंबई प्रांतांतील फेरीवाल्या कापड विक्रेत्यांचे परवाने मुंबई सरकारनें १ सप्टेंबरपासून बंद केले होते. पण आतां परवान्यांची मुदत १ महिन्यानें वाढविण्यांत आली आहे.

## नोटीस

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २८ सप्टेंबर १९४७ रोजीं दुपारीं ५–३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे. सदर सभेंत तारीख ३० जून १९४७ अखेर संपणाऱ्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक, पोट नियम नं. ६२ (A) (२) व नं. ६२ (A) (७) च्या दुरुस्त्या मंजूर करणें, पुढील सालाकरितां बँकेचे डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाइस चेअरमन निवडणें व हिशेबतपासनीस नेमणें, बँकेच्या हिशेबतपासनिसांच्या तपासणी-यादीचा विचार करणें, विम्याच्या पॉलिसीवर द्यावयाच्या कर्जाबाबत बोर्डानें मंजूर केलेले नियम व नोकरीसंबंधीच्या नियमांत मंजूर केलेल्या दुरुस्त्या यांची माहिती घेणें व इतर नेहमीचीं मामुली कामें करण्यांत येतील. डायरेक्टरांच्या निवडणुकीकरितां व हिशेबतपासनिसांचे नेमणुकीकरितां मतें देण्याची वेळ तारीख २८ सप्टेंबर १९४७ रोजीं सकाळीं ९ ते दुपारीं १२–३० वाजेपर्यंत ठेवली आहे. तरी सभेस व निवडणुकीस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें शहर,
ता. ३–९–१९४७

बोर्डाचे हुकुमावरून,
द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.


# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस :**
**१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,३७,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,००,०००रु.वर

बँक स्ट्रीटवर
१,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कॅडॉक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर (नाशिक).

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

मागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १० सप्टेंबर, १९४७


संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कामगारांच्या घातुक धोरणाचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम

टाटा कंपनीच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष, श्री. जे. आर. डी. टाटा, ह्यांनीं कामगारांच्या घातुक धोरणाचा उत्पादनावर कसा प्रतिकूल परिणाम होत आहे, हें स्पष्ट करून सांगितलें. औद्योगिक वांध्यांमुळें हिंदुस्थानांतील कारखान्यांमधील कामाचे किती दिवस बुडाले, ह्यासंबंधी श्री. टाटा ह्यांनीं दिलेले आकडे येथें उद्धृत केले आहेत:—

| वर्ष | वाया गेलेले कामाचे दिवस (कामगार × दिवस) |
|---|---|
| १९४३ | २३,४२,००० |
| १९४४ | ३४,४७,००० |
| १९४५ | ४०,५४,००० |
| १९४६ | १,२२,८५,००० |
| १९४७ (जाने. ते एप्रिल) | ५२,०५,००० |

१९४७ च्या पहिल्या चार महिन्यांत जेवढे कामाचे दिवस वाया गेले, त्यांच्या हिशेबानें १९४७ च्या सबंद वर्षांत त्यांची संख्या १,५६,१५,००० एवढी भरेल. हिंदुस्थानापुढें आज 'उत्पादन वाढविणें का नाश पावणें' असा मोठा बिकट प्रश्न उभा असतांना, कामाचे दिवस वाया जाऊन उत्पादनांत खंड पडणें हिताचें ठरणार नाहीं. श्रीमंत आणि कारखानदारींत अग्रेसर असलेल्या अमेरिकेसारख्या देशांत जरी मोठ्या प्रमाणावर संप झाले तरी त्या देशांची आर्थिक व औद्योगिक सुस्थिति फारशी बिघडणार नाहीं. परंतु, हिंदुस्थानासारखा मागसलेला देश डोकें वर काढूं पहात असतांना, कारखानदार व कामगार ह्यांचेमधील सलोख्याची अत्यंत आवश्यकता आहे. कामगारांच्या सुखसोई वाढल्या पाहिजेत आणि त्यांना योग्य राहाणीचा दर्जा प्राप्त झाला पाहिजे. परंतु उत्पादन सुधारल्याविना केवळ महागाई भत्ते वाढवीत गेल्यानें कामगारांच्या रहाणींत फारसा फरक होऊं शकणार नाहीं व तोहि दीर्घ काळ टिकणार नाहीं. रास्त तक्रार असताहि, ती दूर होण्यासाठी उत्पादन थांबविणें राष्ट्रीय दृष्ट्या घातुक ठरेल, इतकी उत्पादनाची आणि पुरवठ्याची आज गंभीर परिस्थिति झाली आहे.

कामगारांचें अनिष्ट धोरण उत्पादन वाढीचे मार्गांत येत आहे, हें प्रतिपादन करीत असतांना, उत्पादनाचे बाबतींत गिरणीवाले आणि कारखानदार ह्यांनींहि स्वतःवरील जबाबदारी विसरता कामा नये. जास्तींत जास्त नफ्याची दृष्टि न ठेवता, समाजाच्या आवश्यक गरजांस प्राधान्य देण्याचें धोरण त्यांनीं अंगीकारलें पाहिजे. कापडाच्या उत्पादनाचे बाबतींत गिरणी मालक पूर्णपणें निर्दोषी आहेत, असें म्हणतां येईल काय? समाजाच्या घटका-घटकांत कोणत्याहि बाबतींत अन्याय्य भेदाभेद होत नाहीं अशी सर्वांची खात्री झाली तर कामगारांतही अधिक उत्साहानें काम करण्याची स्फूर्ति उत्पन्न होऊं शकेल. कामगारानें उत्पादन वाढीस हातभार लावला तर त्याच्या मोबदल्यांत त्यास योग्य तो हिस्सा मिळेल हें त्यास पटलें पाहिजे. कामगारांच्या घातुक धोरणाविरुद्ध केवळ भाषणें करून व लेख लिहून भागणार नाहीं. टाटा कंपनीनें १९३७ पासूनच आपल्या कामगारांस कंपनीच्या हितसंबंधांत सहभागी केलेलें आहे. गेल्या वर्षीं त्यांत आणखी सुधारणा घडवून आणण्यांत आली त्यामुळें कामगारांचें हित वाढत्या उत्पादनाशीं आणि कंपनीच्या भरभराटीशीं अधिकच निगडित झालें आहे. त्याचा परिणाम अर्थातच उत्पादनाचा खर्च वाढण्यांत, नफा कमी होण्यांत आणि नफ्यांतील कामगारांचा हिस्सा उतरण्यांत होणें अगदीं स्वाभाविक आहे. सहाजिकच, तयार मालाची किंमतहि वाढविल्याखेरीज भागणार नाहीं. टाटा कंपनीनें सरकारकडे अर्ज करून आपल्या तयार मालाच्या किंमतींत वाढ मंजूर व्हावी अशी मागणी केली आहे तिचा विचार कमॉडिटीज प्राइसेस बोर्ड करीत आहे. कामगारांचें वेतन वाढलें परंतु त्यांची कार्यक्षमता सुधारली नाहीं तर अखेरीस वेतनवाढ कोणासच फलदायी कशी होणार नाहीं, हें त्यावरून लक्षांत येईल.

## प. पंजाब सरकारच्या ऑर्डिनन्समुळें ठेवीदारांत चलबिचल

पश्चिम पंजाब (पाकिस्तान) सरकारनें एक ऑर्डिनन्स काढून बँका आपली जिंदगी प्रांताबाहेर नेऊं लागल्यास त्यांस प्रतिबंध करण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला आहे. सरकारच्या लेखी परवानगीशिवाय तेथील बँकाना आपली जिंदगी (मुदती व चालू ठेवी हींहि त्यांत येतात) प्रांताबाहेर आतां हालविता येणार नाहीं.

ह्या ऑर्डिनन्समुळें पाकिस्तान व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें वांधा निर्माण होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्याबाबत पाकिस्तान सरकारकडे विचारणा केली आहे.

वरील प्रकारचा ऑर्डिनन्स काढण्यास पश्चिम पंजाबच्या प्रांतिक सरकारास अधिकारच नाहीं; हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमधील पैशाबाबत झालेल्या करारास प्रस्तुत ऑर्डिनन्स बाध आणीत आहेत, अशी त्या ऑर्डिनन्सवर टीका करण्यांत येत आहे.

"ऑर्डिनन्स बाबत प्रसिद्ध झालेली बातमी बरोबर नाहीं; पश्चिम पंजाब सरकारला ऑर्डिनन्सनें अधिकार दिलेला असला तरी त्याचा त्या सरकारनें अद्याप उपयोग केलेला नाहीं; ठेवीदार आपल्या ठेवी काढून त्या कोठेहि पाठवूं शकतील पण बँकांना मात्र स्वतःची जिंदगी पश्चिम पंजाबचे बाहेर नेतां येणार नाहीं" असा खुलासा पाकिस्तान सरकारच्या फडणिशी खात्यानें केला आहे.

पश्चिम पंजाब सरकारच्या ऑर्डिनन्समुळें पाकिस्तानमधील सर्वच बँकांमधील ठेवी काढून घेण्यासाठी मुसलमानेतर ठेवीदारांनीं गर्दी चालविली आहे. पश्चिम पंजाबप्रमाणेंच पाकिस्तानाच्या इतर प्रांतांतहि तसाच ऑर्डिनन्स काढला जाणार नाहींना, अशी त्यांना भीति वाटत आहे. शनिवारीं १ वाजतां बँका बंद झाल्यामुळें, कित्येक ठेवीदारांना पैसे मिळूं शकले नाहींत. बुधवार, ता. १० पर्यंत बँकांस सुटीच आहे.

## हिंदी शेतीची पुनर्घटना

### श्री. आर. जी. सरय्या, ह्यांचें भाषण.

मुंबई विद्यापीठ अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र ह्या विषयांची एक अभ्यासशाला चालवितें असल्याचें प्रसिद्धच आहे. ह्या संस्थेच्या रौप्य-महोत्सवानिमित्त होणाऱ्या व्याख्यानमालेंतील एक व्याख्यान श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं नुकतेंच दिलें. व्याख्यानाचा विषय " शेतीसंबंधीं धोरण आणि संशोधन " असा होता. श्री. सरय्या ह्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांचा गोषवारा पुढें दिला आहे.

हिंदी शेतकऱ्यांचें महशूर दारिद्र्य, योगक्षेमासाठी जमिनीच्या उत्पन्नावर अवलंबून असणारी फार मोठी लोकसंख्या, दर एकरीं होणाऱ्या उत्पन्नाचें घटत जाणारें प्रमाण आणि परदेशांतून अन्नधान्याची आयात करण्याची जरूरी, ह्या गोष्टींवरून हिंदुस्थानच्या शेतीसंबंधीं धोरण आणि योजना विचारपूर्वक झाली पाहिजे हें उघड दिसून येत आहे. अशा तऱ्हेची योजना फक्त शेतीच्या आधुनिक तंत्राच्या दृष्टीनें न करतां, तींत समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय बाबींचाही विचार केला गेला पाहिजे. पहिल्या प्रथम शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कमी केली पाहिजे; त्यामुळें जमीन कसणाऱ्या प्रत्येकाला जास्तीत जास्त उत्पादन करण्याइतकी मोठी जमीन मिळूं शकेल. अर्थातच, शेतींतून मोकळ्या झालेल्या लोकांना ग्रामोद्योग व इतर उद्योगधंद्यांतून काम दिलें जाईल अशी व्यवस्था करावी लागेल. शेतीचें एकंदर उत्पन्न अशा रीतीनें वाढविलें तर इतर उद्योगधंद्यांतून काम करणाऱ्या लोकांना अधिक उत्पादन करतां येईल. उदाहरणार्थ, रस्ते, घरें, इस्पितळें, शिक्षण, इत्यादि. पण लोकसंख्येच्या व्यवसायांत असा बदल करण्यापूर्वी जमिनीचा अधिकांत अधिक चांगला उपयोग करून घेण्यासाठी अमेरिकेप्रमाणें योजना आंखली गेली पाहिजे.

शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी, सध्यां जमीन धारण करण्याची व ती कसण्याची पद्धत कशी आहे ह्यासंबंधीं पूर्ण व खात्रीलायक माहिती जमा केली पाहिजे. प्रत्येक खेड्यांतील कुळें आणि स्वतंत्र शेतकरी ह्यांची, त्याचप्रमाणें वहिवाटीचे कायमचे हक्क नसणाऱ्या कुळांचीही नोंद केली पाहिजे. निरनिराळ्या भागांतील परिस्थितीस अनुसरून कमींत कमी किती मोठा जमिनीचा तुकडा शेती परवडण्याच्या दृष्टीनें असावा ह्याचा निश्चय केला पाहिजे. अशा तऱ्हेची माहिती जमा करतांना सहकारी शेतीच्या संघटनेच्या दृष्टीनें विशेष लक्ष देण्यांत यावें. शेतीच्या उत्पादनाचे, कार्यक्षमतेच्या दृष्टीनें जमीन वहिवाटण्याचे निरनिराळे प्रकार व अटी ह्यांच्याकडे दिलें जावें तितकें लक्ष आजपर्यंत दिलें गेलेलें नाहीं. हिंदी शेतीच्या संघटनेचा विचार करतांना जमीनदार अगर कुळें ह्या कोणाच्याच बाजूनें पूर्वग्रहदूषित दृष्टी ठेवली जाऊं नये. कोठली पिकें किती काढावीं व त्यांच्या किंमती काय असाव्यात ह्याविषयीं आंकडेवार व इतर माहिती पुरेशी मिळत नाहीं. त्यासाठी जमिनींची जात व मगदूर, पिकांच्या उत्पादनाचे अंदाज, पाण्याची सुलभता आणि पिकांचे व जमिनींचे एकमेकांवर होणारे परिणाम ह्याविषयीं समीक्षणात्मक अहवाल तयार होणें जरूर आहे. ह्याशिवाय उत्पादनाच्या किंमती, माल बाजारांत नेण्याची सोय, वहातूक इत्यादि बाबींचाही अभ्यास झाला पाहिजे: तरच शेतीच्या मालाच्या किंमतीविषयीं योग्य धोरण आखतां येईल.

हिंदी शेतीच्या पुनर्घटनेसाठीं मध्यवर्ती सरकारनें व प्रांतिक सरकारनें एखादें स्वतंत्र खातें उघडलें पाहिजे. ह्या खात्यातर्फे वर सांगितलेले उपक्रम करण्यांत यावेत. ह्या मध्यवर्ती खात्याला हिंदी शेतीविषयक संशोधन-मंडळ अशासारखें नांव देण्यांत यावें आणि त्याला जोडूनच (वस्तूंच्या) किंमती-नियंत्रक मंडळ असावें. अशाच संस्था प्रांतिक सरकारनेंही स्थापन कराव्या. ह्या संस्थांनीं कॉलेजें व विद्यापीठें ह्यांच्या सहकार्यानें संशोधनाचें काम करावें. त्यासाठी कॉलेजांना व विद्यापीठांना खास मदत देण्यांत यावी.

---

## अन्नधान्याची आयात

२० सप्टेंबर १९४७ रोजीं पुऱ्या होणाऱ्या महिन्यांत हिंदुस्थानला बाहेरच्या देशांकडून २,६४,००० टन अन्नधान्य मिळणार आहे. ह्यापैकीं ५५,२०० टन गहूं, ३५,००० टन आटा आणि ९१,६०० टन तांदूळ आहे. हिंदुस्थानला अन्नधान्य निर्यात करणाऱ्या कांहीं देशांत पुढील प्रमाणें परिस्थिति आहे. ऑस्ट्रेलिआनें ७०,००० टन गहूं देण्याचें पूर्वीच कबूल केलें असून त्याशिवाय आणखी ३५,००० टन गहूं आक्टोबर महिन्यांत निर्यात करण्यासाठी मंजुरी दिली आहे. ऑस्ट्रेलिआंतील गव्हाचा पुढील हंगाम चांगला आहे पण त्यामधून करावयाची निर्यात जानेवारी १९४८ च्या आंत सुरू होणें शक्य नाहीं. ब्रह्मदेश आणि आग्नेय आशिया ह्यांमधून हिंदुस्थानला दर महिना सुमारें ५०,००० टन तांदूळ येत आहे. कानडांत आवर्षण पडल्यामुळें निर्यात करता येण्यासारखा गहूं फक्त ४० लक्ष टनच आहे. गेल्या वर्षी हा आंकडा ७० लक्ष टन होता. सिरिआकडून थोडीबहुत बार्ली मिळविण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. अमेरिकेंतून ६०,००० टन गहूं आक्टोबर – नोव्हेंबरमध्यें हिंदुस्थानला धाडण्यांत येईल.

---

## उद्योगमंत्री नामदार तपासे ह्यांची जी. जी. दांडेकर मशीन वर्क्सला भेट

हिंदुस्थानांतील तांदुळाच्या गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीचे आद्य उत्पादक जी. जी. दांडेकर माशिन वर्क्स लि., या कारखान्यास उद्योगमंत्री नामदार तपासे यांनीं नुकतीच भेट दिली. कारखान्याचे चालक श्री. दादासाहेब दांडेकर यांनीं त्यांना स्वतः कारखाना दाखविला आणि चहापानाचे वेळीं कारखान्याचा थोडक्यांत इतिहास सांगितला.

उत्तरादाखल नामदारांनीं सांगितलें, कीं उद्योगधंदे वाढविल्याशिवाय हिंदुस्थानाची भरभराट होणार नाहीं. देश शेतकीप्रधान असूनही आज अन्नतुटवडा आहे. आपलें उत्पादन आपण वाढविल्याशिवाय आणि परदेशी मालाची आयात थांबविल्याशिवाय हिंदुस्थानला खरेंखुरें स्वातंत्र्य अनुभवतां येणार नाहीं. अमेरिकेंत उद्योगधंद्यामुळें संपत्तीचा पूर वहातो आहे आणि सुवर्णभूमि म्हणून समजल्या जाणाऱ्या हिंदुस्थानांत अन्नधान्य, कापड या जीवनोपयोगी वस्तूंची तीव्र टंचाई भासत आहे. बंदरांत येणाऱ्या जहाजांवर आमचें शिधावांटप आम्हांला अवलंबून ठेवावें लागतें. नोकऱ्यांवर विसंबून न रहातां स्वतंत्र उद्योगधंद्यांत यापुढें इंजिनियरिंग आणि शेतकी पदवीधरांनीं पाऊल टाकल्यास राष्ट्राची औद्योगिक प्रगति होऊन देशाचा दर्जा सर्व जगांत वाढेल.

---

## कंपनीकडून डायरेक्टरांनीं कर्ज घेतल्याचा आरोप

### मुंबई हायकोर्टानें टेंपररी इंजंक्शन दिलें

ज्युपिटर एअरवेज लिमिटेड या कंपनीच्या डायरेक्टरांमधील वाद नुकताच मुंबई हायकोर्टांत आला होता. त्याची हकीगत मोठी मनोरंजक व बोधप्रद आहे. ही कंपनी जुलै, १९४६ मध्यें नोंदविण्यांत आली. श्री. ज्वालादत्त पिलानी, त्यांचा मुलगा, डॉ. सर अलगप्पा चेट्टियार व श्री. लक्ष्मणदास हिराचंद डागा असे चौघे त्या कंपनीचे डायरेक्टर होते. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी ज्युपिटर एजन्सीज् लि. या खाजगी कंपनीकडे होती. श्री. ज्वालादत्त यांचा मुलगा व श्री. चेट्टियर हे दोघे त्या एजन्सी कंपनीचे डायरेक्टर होते. मॅनेजिंग एजन्सीच्या करारांत मॅनेजिंग एजंटांना 'ज्युपिटर एअरवेज लिमिटेड'च्या कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर एक ते दोन डायरेक्टर नेमण्याचा अधिकार दिला होता. श्री. ताताचारी नांवाचे गृहस्थ ज्युपिटर एअरवेज कंपनीचे मॅनेजर नेमण्यांत आले होते. पुढें ज्युपिटर एअरवेज कंपनीकडून अशी तक्रार करण्यांत आली कीं, २१ सप्टेंबर १९४६ रोजीं श्री. पिलानी व त्यांचा मुलगा या दोघांच्या 'मेसर्स जे. आर. पिलानी' या नांवाच्या भागिदारी पेढीनें कंपनीकडून दोन लाख रुपयांची उचल केली. ही रकम त्या पेढीनें १२ फेब्रुवारी १९४७ रोजीं परत केली. परंतु पुन्हा २० फेब्रुवारी १९४७ रोजीं पेढीनें कंपनीकडून २ लाख रुपयांचें कर्ज घेतलें असून तें अजून परत केलेलें नाहीं. म्हणून कंपनी ॲक्टाच्या ८६ (आय्.) या कलमान्वयें श्री. पिलानी यांची डॉयरेक्टरशिप रद्द झालेली आहे. तसेंच श्री. पिलानी यांच्या मुलानेंहि १ मे १९४७ रोजीं आपलें एक नोकर श्री. आर. एन्. डालमिया यांच्या नांवावर २ लाख रुपये कंपनीकडून कर्जाऊ घेतले असल्यामुळें त्यांचीहि डायरेक्टरशिप रद्द झालेली आहे. या तक्रारीनुसार सर अलगप्पा चेट्टियार वगैरे मंडळींनीं रजिस्ट्रार ऑफ कंपनीजूकडे डायरेक्टर बोर्डांत झालेल्या या फरकांचें पत्रक भरून पाठवून दिलें व त्यांत पिलानी पिता-पुत्रांचीं नांवें डायरेक्टरांतून कमी केलेलीं दाखविलीं, आणि ज्युपिटर एजन्सीच्या मॅनेजिंग एजन्सीच्या कराराच्या आधारावर श्री. पिलानी यांच्या मुलाला न विचारतां श्री. चेट्टियार यांनीं मद्रासचे श्री. बाळू या नांवाचे एक गृहस्थ डायरेक्टर म्हणून ज्युपिटर एअरवेज लि. च्या डायरेक्टर बोर्डावर स्वतःच नेमून टाकलें. पुढें श्री. अलगप्पा चेट्टियार व श्री. बाळू या दोघा डायरेक्टरांनीं बोर्डाची सभा न घेतां फक्त पत्रकी ठराव ( सरक्युलर रेझोल्युशन ) पास करून ज्युपिटर एअरवेज कंपनीचे डायरेक्टर म्हणून आणखी तीन लोक नेमून टाकले. त्यामुळें पिलानी पिता-पुत्रांनीं मुंबई हायकोर्टांत दावा लावला. त्याच्या प्राथमिक तपासणीचें काम न्यायमूर्ति दिवेटिया यांचेपुढें चाललें. कांहीं दिवसांपासून श्री. चेट्टियार व मॅनेजर ताताचारी हे आपल्याशीं द्वेषभावनेनें वागत असल्याची पिता-पुत्रांची तक्रार असून कंपनीकडून आपण कांहींही कर्ज घेतलेलें नाहीं असा त्यांचा दावा होता. २१ सप्टेंबर १९४६ रोजीं श्री. पिलानी यांना कंपनीकडून दोन लक्ष रुपये मिळाले होते खरे; परंतु ते विमानांचे सुटे भाग विकत घेण्यासाठी कंपनीनें त्यांना दिले होते. त्याचप्रमाणें २० फेब्रुवारीच्या दोन लाख रुपयांची रकमहि कंपनीसाठीं साहित्य खरेदी करतांच दिलेली होती व त्यासंबंधीच्या पावत्यांत तसा स्पष्ट उल्लेख आहे, असें पिता-पुत्रांचें म्हणणें होतें. श्री. डालमिया यांना दिलेल्या रकमेशीं मात्र आपला कांहीं संबंध नाहीं असा त्यांनीं खुलासा केला होता. सारांश, आपल्या दोघांचीही डायरेक्टरशिप रद्द झालेली नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट श्री. चेट्टियार यांनींच दोन लक्ष, तीस हजारांची रकम कंपनीच्या तिजोरींतून घेतली असल्यामुळें त्यांचीच डायरेक्टरशिप रद्द झाली आहे, असा त्यांनीं आरोप केला. त्याचप्रमाणें पिलानी पुत्राच्या कानीं न घालतां व त्याच्या संमतिशिवाय श्री. बाळू यांची नेमणूक श्री. चेट्टियार यांनीं केली असल्यामुळें ती कायदेशीर नाहीं आणि त्यानंतर कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर केलेल्या तिघा डायरेक्टरांच्या नेमणुकाहि बेकायदेशीर आहेत असा त्यांनीं आक्षेप घेतला. श्री. चेट्टियार यांनीं त्यावर खुलासा दिला कीं, कंपनीकडून घेतलेली वरील रकम आपण श्री. पिलानी यांना देण्यासाठीच घेतली. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्यें श्री. चेट्टियार यांचे अनेक व्यवहार पिलानी यांच्या मार्फत झाले होते. त्यांचे दलालीचें कमिशन (ब्रोकरेज) श्री. चेट्टियार यांना श्री. पिलानी यांस देणें होतें. तें देणें देण्यासाठीं आपण कंपनीकडून पैसे घेतले असें त्यांचें म्हणणें होतें. या सर्व हकीगतीवरून श्री. पिलानी पिता-पुत्रांनीं आपण अजूनहि डायरेक्टर असल्याचें जाहीर करण्यासाठीं दावा आणला व त्याचा निकाल लागेपर्यंत डायरेक्टर बोर्डातून आपणास वगळूं नये अशी तूर्तांची ताकीद ( टेंपररी इंजेक्शन ) कंपनीवर बजावण्याची मागणी केली. मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. दिवेटिया यांनीं त्याप्रमाणें ताकीद दिली असून मूळच्या चार डायरेक्टरांव्यतिरिक्त इतर कोणीहि, दाव्याचा निकाल लागेपर्यंत, डायरेक्टर म्हणून काम करूं नये असा हुकूम दिला आहे. मुख्य दाव्याचें काम २७ ऑक्टोबर १९४७ रोजीं मुंबई हायकोर्टापुढें चालणार आहे. डायरेक्टरांनीं कंपनीकडून कर्ज घेतल्यास त्यांची डायरेक्टरशिप रद्द होते या कायद्यांतील नियमाचा भलाबुरा उपयोग करून अथवा आधार घेऊन डायरेक्टर बोर्डांतील परस्पर विरोधी लोकांनीं बखेडे माजल्याचीं उदाहरणें नेहमीं घडून येतात. यासाठीं याबाबत अधिक खुलासेवार नियम असणें इष्ट होईल.

### शिंद्या कंपनीच्या दोन नव्या आगबोटींचे संचारास प्रारंभ

यात्रेकरूंच्या वहातुकीसाठीं दोन आगबोटी शिंद्या स्टीम कंपनी लवकरच सुरू करीत आहे. त्यांपैकीं एकीच्या जलप्रवासाचा सौ. कस्तुरबाई वालचंद ह्यांच्या हस्तें ता. १८ सप्टेंबर रोजीं ग्लॅसगो येथें प्रारंभ केला जाईल. ह्या दोन्ही आगबोटींत मिळून १६० पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या आणि २,८०० तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची सोय आहे.


### दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची तिसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २१।९।४७ रोजीं सकाळीं ८ वाजतां बँकेचे इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९४६-४७ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाईस चेअरमन यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती, वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ८-३० ते दुपारीं १ अशी आहे. तरी सर्व सभासदांनीं येणेचें अगत्य करावें अशी विनंती आहे.

कराड १-९-४७

सि. कृ. पकांडे
मॅनेजिंग डायरेक्टर

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश–
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त–

## दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर



## कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.

–संचालक मंडळ–

रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप, बी.ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. बी. पोतदार, बी.ए., एलएल.बी. बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, ( एक्स–ऑफिशिओ ) पुणें. अधिक माहितीसाठी लिहा—

कृष्णा–कित्तूर
जिल्हा बेळगांव.

विंचूरकर आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंटस्.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण-खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिले.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



## शेअर्स विकणें आहेत.

डुप्लीकेटर्स, शटल्स, प्रोसेस व फोटोग्रॅफिक कॅमेरे व इतर बऱ्याच प्रकारची उंची मशिनरी तयार करणारे सुप्रसिद्ध

## मेसर्स शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., बेळगांव.

यांचे विक्रीस काढलेले प्रत्येकीं १० रुपयांचे २०,००० शेअर्सपैकीं फारच थोडे शेअर्स विकाऊ आहेत.

अर्ज व इतर माहितीसाठी खालील पत्त्यावर लिहाः—

आर. जे. सावंत
शेअर्स व स्टॉक ब्रोकर्स
६२, न्यू स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग,
अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.)

दीड महिन्यापूर्वीपासून बाजाराला उतरती कळा लागलेली आहे ती आजतागायत. मंदीला कारणीभूत झालेली कारणपरंपरा येणेप्रमाणें: (१) सर चिंतामण देशमुख यांनीं ब्रिटनमध्यें ज्या प्रकारची आर्थिक आपत्ति कोसळली आहे त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि काळजी घेतली नाहीं तर कोसळण्याचा दाट संभव आहे असें केलेलें प्रतिपादन. ( ) सर जॉन मथाई यांनीं हिंदी भांडवलवाला वर्ग संपुष्टांत आणण्याबद्दलचें केलेलें विधान. (३) टाटाचे अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांनीं डिफर्डला यंदा कमी व्याज देण्याची सांगितलेली, कंपनीचा वाढता उत्पादन खर्च, मजुरांच्या अव्वाच्या सव्वा मागण्या आणि त्याकरतां कामाची ढंगळमंगळ. कोळशाचा अपुरा पुरवठा वगैरे कारणें. (४) श्री. षणमुखम् चेट्टी यांनीं किंमती कमी करण्याबद्दलचें सरकारचें सांगितलेलें धोरण (५) पंजाबमधलि कत्तल व महात्माजींचा उपवास.

अशा परिस्थितींत बाजार सुधारण्याची कांहीं आशा नाहीं, अशा प्रकारची भावना बाजारांत पसरली असल्यास नवल नाहीं. परंतु असल्या काळ्या वातावरणांतच तेजीचीं कारणें सुप्त असतात. फक्त तीं एखाद्या जबाबदार अधिकारी माणसानें उजेडांत आणली असतांना बाजारमधील भावना एका रात्रींत पलट खातें असा अनुभव आहे. आमच्या दृष्टीनें खालील घटना मंदीला प्रतिकार होण्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या वाटतात.

(१) मागील वर्षीं झालेल्या कमाल भावांच्या मानानें आज भाव ५०% पर्यंत खाली आहेत, त्या मानानें एकदम भाव मोठ्या प्रमाणांत तुटण्याची जवळ जवळ अशक्यता आहे. (२) टाटाचें जूनपासून घटलेलें उत्पादन सुधारत आहे. (३) मजुरांनीं आपल्या मागण्यांना पायबंद घालून सध्यांच्या घटत्या उत्पादनाच्या काळांत मालकाशीं सहकार्य केलें तरच त्यांचा निभाव आहे. अशा तऱ्हेची जाणीव मजुरांत उत्पन्न झालेली आहे याचें उत्तम उदा. इंग्लंडमधील मजूर पुढाऱ्यांनीं केलेलीं भाषणें आणि इकडेही मध्यंतरी समाजवादी पुढारी श्री. अच्युत पटवर्धन यांनीं त्याच प्रकारचें केलेलें भाषण. (४) याच मुद्द्याला धरून पुरवठा मंत्रि डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनीं मर्यादेपलिकडे मजुरांना उचलून न धरण्याची निदर्शित केलेली सरकारची दृष्टि. (५) बँकांचे शेअर्स आणि विशेषतः सरकारी कागद विशेष मजबुती दाखवून आहेत, आतांपर्यंत झालेली सरकारी कागदाची बरीच मोठी बेंचाण रिझर्व बँकेनें प्राशन करून बाजारमध्यें मोठ्या प्रमाणांत पैसा मोकळा सोडला आहे. (६) याचें प्रत्यंतर "कॉल-मनी" दर ½ टक्क्यावर येऊन 'फंड्स' दारोदार हिंडत आहेत. (७) आयात व्यापारावर कडक नियंत्रण आल्यामुळें त्यामध्यें गुंतणारा पैसा मोकळा रहाणार आहे. (८) नोव्हेंबरमध्यें ४७/५० चे ५६ कोट रु. कर्ज परत फेडलें जाणार आहे. (९) टाटाच्या मालाच्या किंमती वाढवून दिल्या जाण्याची शक्यता बरीच आहे. मंदीवाल्यांची विशेषतः टाटा डिफर्डसमध्यें बेंचाण जरा अंगावाहेरच झालेली आहे. (१०) आणि सरतेशेवटीं महात्माजींचा उपवास संपून ते पंजाबकडे शांतता प्रस्थापित करण्याकरतां जात आहेत. आतां फक्त हिं. सरकारचें उद्योगधंद्याबाबतच्या धोरणाचें स्पष्टीकरण यावयास हवें- म्हणजे बाजाराला सुधारल्याखेरीज गत्यंतर नाहीं. आमच्या दृष्टीनें टाटा ऑर्डिनरी, बॉम्बे बर्मा, मोरारजी, विष्णू, इं. स्टीमशिपें, सिमेंट, युनायटेड कमर्शिअल बँक, बकिंगहॅम, कर्नाटक, आणि चहाचे हंसिमारा, नेलियापथी, कालासा, पेरिया आणि विश्वनाथ यांची खरेदी गुंतविणाराला आणि परच्युरंट सटोडीयांना फायदेशीर ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

**रशिआंतील धार्मिक स्वातंत्र्य** — पं. राहुल सांकृत्यायन रशिआमध्यें २ वर्षें राहून नुकतेच परत आले. १९३२ सालापासून रशिआंतील धर्मविरोधी वातावरण निवळत गेलें आणि आज त्या देशांत मुसलमान, ख्रिश्चन अगर बुद्धधर्मी यांना मशिदी, चर्चेस, अगर देवळें बांधण्यासाठी भरपूर सवलती देण्यांत येतात असें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें, धार्मिक वाङ्मयाच्या प्रकाशनालाही बंदी करण्यांत येत नाहीं.

**मानवी-आयुमर्यादा**—सोव्हिएट रशिआंतील शास्त्रज्ञ मानवी जीविताची मर्यादा वाढविण्यासंबंधी प्रयोग करीत आहेत. त्यांचे प्रयोग यशस्वी झाले तर मनुष्याचें आयुष्य १२० वर्षांपर्यंत वाढविता येईल. अगदीं अनुकूल परिस्थितींत तें १७५ वर्षांपर्यंतही जाऊं शकेल. ह्यासंबंधीं डॉ. युसुनिरिनॉव्ह ह्यांनीं असा शोध लावला आहे कीं वार्धक्यांत माणसाच्या शरीरांत एक प्रकारचा रंगीत पदार्थ उत्पन्न होतो. त्यामुळें शरीरांतील मज्जतंतू नाश पावतात. लहान मुलांत हा द्रव पदार्थ आढळून येत नाहीं. हा द्रव पदार्थ निराळा काढण्यांत ह्या शास्त्रज्ञाला यश आलें आहे.

**बिहारमधील साखरेचा धंदा**—बिहारमधील साखरेच्या धंद्याला स्थैर्य आणण्यासाठी बिहार सरकारनें एक शुगरकेन डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन केले आहे. बोर्डावर सरकारचे बारा प्रतिनिधी रहातील. ह्या कामासाठी २ कोटी, ५२ लाखांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

**गव्हर्नर जनरलसाठी रोल्स-रॉइस**—हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल, लॉर्ड मौंटबॅटन, ह्यांच्यासाठी एक नवी रोल्स रॉइस मोटार इंग्लंडहून लवकरच हिंदुस्थानांत येणार आहे. मोटारीची मागणी कारखान्याकडे गेल्याच वर्षी करण्यांत आली होती पण कांहीं अवश्य ती सामुग्री न मिळाल्यामुळें मोटार आधीं तयार होऊं शकली नाहीं. मोटारीची किंमत ३,७०० पौंड आहे.

**तुंगभद्रेवरील धरण व जमिनीच्या किंमती**—भारत सेवक समाजाचे एक सदस्य, श्री. के. जी. शिवस्वामी, ह्यांनीं तुंगभद्रेवरील धरणाच्या योजनेमुळें आसपासच्या जमिनींच्या वाढत्या किंमतीबद्दल एक पुस्तक लिहिलें आहे. ह्या धरणाच्या योजनेमुळें जमिनीच्या सौदांना सट्टेबाजीचें स्वरूप आलें असून अशा प्रसंगीं कांहीं देशांतून जमिनीच्या खरेदी-विक्रीला आळा घालण्याचे कायदे होतात, ह्या गोष्टीकडे त्यांनीं लक्ष वेधलें आहे. मद्रास सरकारनें मात्र नफेबाजीला कुरण मोकळें ठेवलें आहे, अशी टीका करण्यांत येत आहे.

**सन्मित्र को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. मुंबई**

ह्या बँकेची २३ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार ता. २८-९-१९४७ रोजीं दुपारीं २ वाजतां [ विष्णूबाग ] शेणवीवाडी, मुंबई नं. ४ येथें भरणार आहे."

---

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.

## विविध माहिती

**विमातज्ञाचें निधन**—ओरिएंटल विमा कंपनीचे माजी मॅनेजर मि. एच. ई. जोन्स हे नुकतेच मरण पावले. हिंदुस्थानांतील एक प्रसिद्ध विमातज्ञ म्हणून त्यांची ख्याती होती. मि. जोन्स हे ओरिएंटल विमा कंपनीचे मॅनेजर म्हणून १९२२ सालापासून १९४६ पर्यंत काम पहात होते. हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या संघाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९२७ सालापासून, त्यांनीं सदर संस्थेंत लक्ष घातलें होतें.

**पश्चिम बंगालची प्रमाणवेळ**—पश्चिम बंगालच्या सरकारनें ता. १ सप्टेंबर पासून घड्याळें एक तास मागें करून हिंदुस्थान सरकारच्या वेळाशीं आपली वेळ जुळवून घेतली आहे. ता. १ ऑक्टोबर १९४१ पासून बंगालमध्यें बंगालमधील प्रमाणवेळ मुक्रर करण्यांत आली होती. बंगालमधील लवकर होणाऱ्या सूर्योदयाला अनुसरून पश्चिम व मध्य हिंदुस्थानापेक्षां ही वेळ १ तास आधींची ठेवली होती. पूर्व बंगालमध्यें मात्र बंगालची वेळ प्रमाण धरण्यांत येणार आहे.

**फॅक्टरी ॲक्टमध्यें दुरुस्ती**—कामगारांचें आरोग्य आणि सुरक्षितता ह्यांच्या दृष्टीनें फॅक्टरी ॲक्ट हिंदुस्थान सरकार दुरुस्त करणार आहे असें समजतें. नवीन निघणाऱ्या कारखान्यांची जागा, त्यांतील यंत्रसामुग्री, किंवा जुन्या कारखान्यांचा विस्तार इत्यादि संबंधींचे नकाशे चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज ह्यांचे-कडे आगाऊ पाठवावे अशी एक नियोजित दुरुस्ती आहे. दुसरी सुधारणा, कारखाना चालू झाल्यावर उत्पादनामुळें जी घाण अगर जो कचरा निर्माण होईल तो बाहेर सोडण्याची नीट व्यवस्था करण्याबाबत आहे.

**मुंबई प्रांतांतील साखर वांटप**—मुंबई प्रांतांतील साखरेच्या वांटपाच्या पद्धतींत सुधारणा करण्यासाठी सरकारनें लोकांकडून सूचना मागविल्या आहेत. १ डिसेंबर १९४६ पासून सुरू झालेल्या वर्षासाठी मुंबई प्रांताला १,२६,००० टन साखर मंजूर करण्यांत आली आहे. त्यापैकीं १,०९,९०० टन घरोघर वाटली जाते असून १६,००० टन हॉटेलांसाठीं देण्यांत आली आहे. युद्धापूर्वी प्रांतांत दरवर्षी दरडोई १६·६ पौंड साखर खपत असे. सध्या मुंबई व उपनगरांत दरमाणशीं आठवड्याला ९ औंस साखर दिली जाते. १ लाखावर लोकवस्ती असलेल्या शहरांतून वरील प्रमाण ७ औंस आहे. ५० हजार ते १ लाख वस्तीच्या गांवांत तें ६ औंस आहे व २५ हजार ते ५० हजार वस्तीच्या गांवांत तें ५ औंस आहे. २५ हजारांच्या खालील लोकवस्तीच्या गांवांत हें प्रमाण फक्त ४ औंस आहे. ज्या भागांत वांटपपद्धति चालू नाहीं त्या भागांसाठीं ३८ हजार टन साखर दिली जाते. अशा भागांपैकीं गुजराथेंत वरील प्रमाण २ औंस व इतर ठिकाणीं १॥ औंस पडतें. युद्धकाळीं झालेली शहरांतली लोकसंख्येची वाढ व अपुरा पुरवठा ह्यामुळें साखरेची टंचाई तीव्रतेनें भासत आहे.

**उपाशी राहूनही भागणार नाहीं**—ऑस्ट्रेलिआचे एक मंत्री, मि. कॉल्वेल, ह्यांनीं ब्रिटनच्या आर्थिक संकटाबद्दल पुढील विचार व्यक्त केला आहे. " ब्रिटननें आपलें पोट कितीही मारलें, तरी त्याला पूर्वीचे भरभराटीचे दिवस कधींही प्राप्त होणार नाहींत. कारण, तेथील अर्थव्यवस्था फक्त ३,५०,००,००० लोकांचेंच उदरभरण करूं शकेल. ब्रिटनमध्यें लोकसंख्येची वाढ अतोनात झाल्यामुळें सरकारनें १ ते १॥ कोटी लोकांना देशांतर करण्याला उत्तेजन द्यावें. ".















हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.